**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक १५ मार्च २०२४**

**ठळक बातम्या**

1. **आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याकरता केंद्रीय निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद उद्या दुपारी नवी दिल्ली इथं होणार.**
2. **राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांच्या अर्थसहायात भरीव वाढ - आता मिळणार महिन्याला वीस हजार रुपये.**
3. **राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेला आजपासून नागपूरमधे प्रारंभ.**
4. **उद्यापासून नागपूरसह पूर्व विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात वादळी पावसाचा येलो अलर्ट.**

*****

**लोकसभा निवडणूक वेळापत्रक**

आगामी लोकसभा निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर करण्याकरता, केंद्रीय निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद उद्या दुपारी नवी दिल्ली इथं होणार आहे. काही राज्यांमधल्या विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रमही यावेळी जाहीर होईल. या पत्रकारपरिषदेचं थेट प्रक्षेपण समाजमाध्यमांवर करण्यात येणार असल्याचं निवडणूक आयोगाच्या एक्स समाज माध्यमावरून सांगण्यात आलं आहे. दरम्यान, नवनियुक्त निवडणूक आयुक्त, ज्ञानेश कुमार आणि सुखबीरसिंग संधू यांनी आज पदभार स्वीकारला. निर्वाचन सदन या मुख्य निवडणूक कार्यालयात मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी या दोघांचं स्वागत केलं. जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीतल्या २०२४च्या निवडणुकांआधी झालेल्या या नेमणूकांना महत्त्व असल्याचं राजीव कुमार यावेळी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या, निवडसमितीनं, ज्ञानेश कुमार आणि सुखबीरसिंग संधू यांच्या नावाची शिफारस केल्यानंतर, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काल निवडणूक आयुक्तपदी त्यांची नेमणूक केली.

**निवडणूक रोखे**

केंद्रीय निवडणूक आयोगानं, निवडणूक रोख्यांची माहिती आपल्या संकेतस्थळावर प्रकाशित केली असून, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार निवडणूक रोख्यांची सर्व माहिती, केंद्रीय निवडणूक आयोगाला, स्टेट बँकेनं तेरा मार्च तारखेला दिली. १२ एप्रिल २०१९ ते १५ फेब्रुवारी २०२४ दरम्यान, खरेदी झालेल्या आणि वटलेल्या निवडणूक रोख्यांची माहिती बँकेनं दिली आहे. दरम्यान, निवडणूक रोख्यांच्या निधीबाबत कोणत्या कंपनीनं किती निधी दिला ते गुरूवारी जाहीर करण्यात आलं. पण त्यात कोणत्या कंपनीनं कोणत्या राजकीय पक्षाला किती निधी दिला, हे मात्र स्पष्ट नाही. त्यावर सर्वोच्च न्यायालयानं निवडणूक आयोगाला विचारल्यानंतर त्यांनी स्टेट बँकेकडे माहिती असल्याचं सांगितलं. त्यानंतर सोमवारपर्यंत याबाबत विस्तृत माहिती द्यावी असे निर्देश, न्यायालयानं स्टेट बँकेला दिले आहेत.

**एकनाथ खडसे**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी रावेर लोकसभा मतदारसंघ  शरद पवार गटाच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसकडे आला  असून, आपण ही निवडणूक लढणार नसल्याचं  आमदार एकनाथ खडसे यांनी आज  जाहीर केलं. तब्बेत बरी नसल्यामुळं आणि डॉक्टरांनी तसा सल्ला दिल्यामुळं, आपण निवडणूक लढणार नाही असं खडसे म्हणाले. आज मुंबईतील यशवंतराव चव्हाण सेंटर इथ ज्येष्ठ नेते शरद पवार यांची त्यांनी भेट घेतल्यानंतर त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. याशिवाय तिथं रोहिणी खडसे सुद्धा निवडणूक लढणार नाहीत असंही ते म्हणाले.

**अर्थसहायात भरीव वाढ**

राज्यातील ज्येष्ठ पत्रकारांच्या सन्मान निधीत, अकरा हजारावरून वीस हजार रुपये अशी भरीव वाढ करण्याचा निर्णय, राज्य शासनाने घेतला आहे. पत्रकार संघटनांनी केलेल्या मागणीवर, वयोवृद्ध पत्रकारांची हेळसांड थांबविण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं  मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेत, अधिस्वीकृतीधारक पात्र ज्येष्ठ पत्रकारांना सध्या दर महिन्याला अकरा हजार रुपये सन्मान निधी मिळतो. आता नऊ हजार रुपयांनी ही रक्कम वाढविण्याचा निर्णय घेण्यात आल्यानं, राज्यातील वयोवृद्ध पत्रकारांना मोठा दिलासा

मिळाला आहे. माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालया मार्फत, ही योजना राबविण्यात येते.

**एअर चीफ मार्शल व्हीआर चौधरी**

नागपूरच्या वायुसेना नगर इथं काल आणि आज आयोजिण्यात आलेल्या, कमांडर्स कॉन्फरन्समध्ये, एअर चीफ मार्शल व्ही.आर.चौधरी यांनी, मेन्टेनन्स कमांडच्या, फील्ड कमांडर्सना संबोधित केलं. यावेळी, एअर चीफ मार्शल यांनी आपल्या संबोधनात, मेन्टेनन्स कमांड आणि त्यांच्या विविध युनिट्सद्वारे फ्लीट्स आणि सिस्टम्सच्या कार्यक्षमता वाढविण्यासाठी करण्यात येणाऱ्या महत्वपूर्ण उपाय योजनांची माहिती दिली. व्ही.आर.चौधरी यांनी मेंटेनन्स कमांडच्या आत्मनिर्भर भारत अभियान आणि क्षमता वाढीसाठी केलेल्या योगदानाचं देखील त्यांनी कौतुक केलं. राष्ट्र उभारणीच्या दिशेनं सुरू झालेल्या परिवर्तनात्मक बदलांमध्ये, सर्व कर्मचाऱ्यांच्या सक्रिय सहभागावर त्यांनी भर दिला. यावेळी संबंधित क्षेत्रातील उपक्रमांमध्ये सर्वोत्कृष्ट ठरलेल्या युनिट्सना पुरस्कार देखील प्रदान करण्यात आले.

**मध्य रेल्वे**

मध्य रेल्वेच्या नागपूर मंडळ विभागानं ऐतिहासिक कामगिरी करत तेरा मार्च रोजी चालू आर्थिक वर्षात अठरा दिवस शिल्लक असताना, ५,०३६ पूर्णांक साठ कोटी रुपये इतकी कमाई केली आहे. आजवरची ही सर्वोच्च कमाई असल्याची माहिती नागपुर विभागीय रेल्वे मंडळ प्रबंधक मनिष अग्रवाल यांनी दिली आहे. या महिन्या अखेर यात आणखी २५० कोटीं रुपयांची भर पडण्याची अपेक्षा आहे.

**शोभणे बाईट**

आता ऐकुया, 'मेरा पहला वोट देश के नाम' उपक्रमाअंतर्गत, ज्येष्ठ साहित्यिक आणि ९७व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ.रवींद्र शोभणे यांचं आवाहन -

***नुकतेच आपल्या भारतात निवडणुकीचे वारे वाहायला लागलेले आहे. आणि या निवडणुकीच्या सबंध वातावरणामध्ये तरुण हा अधिक उत्साहाने पुढे येतो आहे.***

*याच पार्श्वभूमीवर 'मेरा पहिला वोट देश के नाम' असे एक अभियान राबविला जात आहे. या अभियानातंर्गत भारतातील तमाम तरूणांनी जे पहिल्यांदाच मतदान करतात आहे अशा तरुणांनी एकत्र यावं आणि आपला आवडता उमेदवार ज्या उमेदवारापासून आपल्याला अपेक्षा आहे. जो उमेदवार आपल्या समाजाचं काहीतरी हित करू शकेल अशा उमेदवाराला सद्सद विवेकबुद्धीने मतदान करावं आणि आपला मतदानाचा अधिकार गाजवावा. मतदानाचा हक्क हा भारतीय घटनेने दिलेला मूलभूत हक्क आहे आणि तो हक्क गाजवणे हा आपला मूलभूत अधिकार आहे.*

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अखिल भारतीय प्रतिनिधी सभेला आजपासून नागपूरमधे रेशीमबाग इथं, डॉ.केशव हेडगेवार स्मृती मंदिरात प्रारंभ झाला. संघाच्या संकेतस्थळावर, २०१७ ते २०२३ पासून, प्रतिवर्षी एक लाख पेक्षा जास्त सदस्यत्वासाठी नोंदणीचे अर्ज आले आहेत अशी माहिती सह-सरकार्यवाह डॉ.मनमोहन वैद्य आज नागपूरमध्ये पत्रकार परिषदेत दिली. सुमारे पंधराशेच्यावर प्रतिनिधी या तीन दिवसीय प्रतिनिधी संमेलनाला उपस्थित राहणार असून, संघाचा विस्तार होत असताना यात कुटुंब प्रबोधन, पर्यावरण रक्षा, सामाजिक समरसता, नागरिक कर्तव्य पालन, स्वदेशी जागरण या पाच विषयावर, अधिकाधिक सदस्यांना संघात सामिल करुन घेण्यावर आमचा प्रयत्न असल्याचं डॉ.वैद्य यांनी स्पष्ट केलं.

**सुधीर मुनगंटीवार**

नवी दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठात “छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन” केंद्र उभारण्यासाठी राज्य सरकारनं दहा कोटी रूपयांचा निधी मंजूर केला आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी ही माहिती दिली. महाराष्ट्राचा सांस्कृतिक कार्य विभाग हा उच्च आणि तंत्र शिक्षण विभागाच्या माध्यमातून हा निधी लवकरच जवाहरलाल नेहरू विद्यापीठाला वितरित करणार आहे असं त्यांनी सांगितलं.

**कौशल्य विकास केंद्र**

अमरावती येथील श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र कौशल्य विकास केंद्र, यांच्या वतीनं संचालित - 108 कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन उप-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे आज संपन्न झालं. या कार्यक्रमात कौशल्य विकास विभाग मंत्री मंगल प्रभात लोढा आणि महाराष्ट्र कौशल विकास केंद्राच्या उपायुक्त निधी चौधरी देखील सामील झाल्या होत्या. महाराष्ट्रातील तरुणांना स्वयं-रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात हा या कौशल्य विकास केंद्रांचा प्रमुख उद्देश आहे.

**हवामान**

बंगालच्या उपसागरात चक्रीवादळ सदृश्य स्थिती निर्माण झाल्यानं त्याचा परिणाम विदर्भाच्या हवामानावर पडण्याची शक्यता, हवामान खात्यानं वर्तविली आहे. दिनांक १६ ते १८ मार्च दरम्यान पूर्व विदर्भाच्या नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यातील काही भागांत वादळासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. हवामान विभागानं येलो अलर्ट जारी केला असून, याशिवाय पश्चिम विदर्भातील यवतमाळ आणि अमरावती मध्ये १७ आणि १८ मार्चला वादळी वाऱ्यासह पाऊस पडू शकतो. दरम्यान, आज विदर्भात कमाल तापमान यवतमाळ जिल्ह्यात ३९ पूर्णांक पाच अंश सेल्सिअस इतकं नोंदविण्यात आलं.

**'ऊर्जा' चॅट बॉट**

महावितरणच्या वीज ग्राहकांना तक्रार निवारण, बिल भरणा, नवीन वीजजोडणी अशा विविध कामांसाठी मदत मिळावी याशिवाय त्यांच्या विविध शंकांचे निरसन करण्यासाठी महावितरणनं कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानावर आधारीत चॅट-बॉट सेवा सुरू केली आहे. ही सेवा सध्या महावितरणच्या www.maha-discom.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, लवकरच ती मोबाईल फ़ोन ॲप्लिकेशनवर देखील उपलब्ध होणार आहे. या सेवेमुळं ग्राहकांनी प्रश्न विचारल्यानंतर त्याचं उत्तर काही क्षणातच मिळत आहे.

**पर्यावरण सेवा योजना**

पर्यावरण सेवा योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात, राज्यातील सात हजार ५०० शाळांमध्ये ही सेवा योजना राबवण्याचा निर्णय, राज्य शासनानं घेतला आहे. शालेय जीवनामध्ये विद्यार्थ्यांना पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व प्रत्यक्ष कृतीद्वारे रुजवावे या उद्देशानं राज्यात पर्यावरण सेवा योजना राबवण्यात येते. सुरुवातीस राज्यातील बारा जिल्ह्यातील ५० शाळांमध्ये ही योजना राबवण्यात येत असून, आता या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात, पुढील पाच वर्षांत राज्यातील सात हजार ५०० शाळांमध्ये राबवण्यात येणार आहे. स्थानिक पर्यावरणाशी निगडित समस्या विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभाग आणि कृती समजून घेऊन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी प्रोत्साहन देणे, निसर्ग आणि मानव यांचे नाते बालवयात बिंबवणे हा या योजनेचा उद्देश आहे. राज्यातील महानगरपालिका, नगर पालिका, नगर परिषद, ग्राम पंचायत क्षेत्रातील इच्छुक शाळा यासाठी अर्ज करू शकतात. ही योजना राबवण्यासाठी पाच कोटी ८७ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

******